तपास अधिकारी प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नांदेड  **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0238  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/07/2023 23:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 13/07/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/07/2023
**Time From (वेळेपासून):** 16:31 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/07/2023  **Time (वेळ):** 22:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 028
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/07/2023 22:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्य,शिवाजीनगर नांदेड ताजि नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रमेश गणपतराव तोटे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : गणपतराव

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | धाम परीसर परभणी ,परभणी ,शिवाजी नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | धाम परीसर परभणी ,परभणी ,शिवाजी नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष हनमंतराव कंदेवार | | | 1. 60.,कष्णकुज हनुमान मंदिराजवळ,पाटबंधारे नगर, तरोडाबु,,नांदेड ,शिवाजी नगर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास**)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (**प्रथम खबर हकीकत **):**

दिनांक 25/07/2023

फिर्याद

मी रमेश गणपतराव तोटे, वय 53 वर्श, व्यवसाय-नोकरी, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी, सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय नांदेड, तोष्णीवाल बिल्डींग, कविता प्रिंटींग प्रेस च्या वर शिवाजीनगर, नांदेड ता.जि. नांदेड मुळ रा. घर नं.35/1/12 दत्त धाम परिसर वसमत रोड परभणी, ता.जि. परभणी मोबाईल क्रमांक 9175015362.

समक्ष पोलीस स्टेशन शिवाजीनगर नांदेड येथे हजर येवून लेखी फिर्याद लिहून देतो की, मी वर नमुद कार्यालयात सन 2020 पासून नेमणुकीस आहे. दिनांक 13/07/2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे हजर येवून तक्रार दिली ती खालील प्रमाणे

आमच्या कार्यालयाचे प्रमुख श्री. संतोष हनमंतराव कंदेवार, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा नांदेड यांनी नांदेड जिल्हयातील 66 ग्रामपंचायतीचे सन 2021-2022 चे लेखापरिक्षण करून अहवाल सादर करण्याचे मला लेखी आदेश दिले आहेत. त्याचे काम माहे एप्रिल 2023 पासुन चालू आहे.

ग्रामपंचयातीचे लेखापरिक्षणाचे काम माझेकडे दिल्याचा मोबदला म्हणून ज्या ग्रामपंचयातीचा खर्च 5 लाख पर्यन्त आहे त्यास 1000/-रूपये प्रति ग्रामपंचायत, ज्या ग्रामपंचायतीचा खर्च 10 लाखा पर्यन्त आहे त्यास 2000/- रूपये प्रति ग्रामपंचायत व ज्या ग्रामपंचायतीचा खर्च 10 लाखा पेक्षा अधिक आहे त्यास 10,000/- रूपये प्रति ग्रामपंचायत असे पैसे दयावे लागतील अशी लाचेची मागणी श्री. संतोष हनमंतराव कंदेवार यांनी माझेकडे प्रत्यक्ष व आमचे कार्यालयातील श्री. वामन काकडे, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी यांच्या मार्फतीने जुन महिण्यात माझ्याकडे केली होती.

सदर तक्रारीचे अनुषगांने श्री.गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेले दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य यांचा ऐकमेकांना परिचय करून दिला. मी पंचाना माझी तोंडी तक्रार सांगितली. त्यानंतर पो.नि. श्री बोडके यांचेकडे मी दिनांक 13/07/2023 रोजी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी तक्रार वाचुन मी दिलेली लेखी तक्रार व तोंडी सांगितलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री करून सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी सहया केल्या.

त्यानंतर पो.नि. श्री बोडके यांनी लाच मागणी पडताळणीचा उद्देष सांगुन मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली. त्यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ ईश्वर जाधव यांनी पो.नि. श्री बोडके, माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर लाचमागणी पडताळणी कामी लोकसेवक श्री कंदेवार यांचे कार्यालय सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा, कार्यालय नांदेड, तोष्णीवाल बिल्डींग, कविता प्रिंटींग प्रेस च्या वर शिवाजीनगर, नांदेड ता.जि. नांदेड येथे त्यांची भेट घेण्यासाठी पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनतर पो.नि. श्री बोडके यांनी दोन्ही पंच, सापळा पथक व मला लाचमागणी पडताळणी कार्यवाही अनुषंगाने सुचना दिल्या. मला व पंच क्रमांक 1 पांडुरंग आनंदराव काळे असे मोटार सायकलने लोकसेवक श्री कंदेवार यांची भेट घेणेकामी ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून वेळ 16.31 वा. रवाना केले.

मी व पंच क्रमांक 1 असे सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा, कार्यालय नांदेड येथे जावून कंदेवार साहेब यांची भेट घेतली. तेव्हा पंच क्रमांक 1 काळे यांना लोकसेवक श्री कंदेवार यांनी कक्षाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी व कंदेवार साहेब असे ग्रामपंचयातीचे लेखापरिक्षण अहवाल संबंधाने चर्चा केली तेव्हा कंदेवार साहेबांनी माझेकडे लेखा परिक्षणासाठी असलेले घटका बाबत माहिती विचारून घेतली आणि म्हणाले की, टोटल सत्तर करून टाक, त्यावर मी कंदेवार साहेबांना म्हणालो की, सत्तर हजार रूपये जास्त होतात. थोड कमी करा अशी विनंती केली असता श्री. कंदेवार साहेब म्हणाले की, जास्त काय घासघिस करू नका, साठ करा मोकळे व्हा असे



Scanned with CamScanner

म्हणून माझेकडे लाचेची मागणी केली. तेव्हा मी ठिक आहे असे सांगुन थोड वेळ द्या, आजच करतो अशी विनंती करुन, आज पन्नास करतो असे सांगितले तेव्हा कंदेवार साहेबांनी ठिक आहे असे म्हणून मान हलवून होकार दिला.

त्यानंतर मी व पंच क्र.1 असे वेळ 16.58 वा ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे परत आलो. तेव्हा पोकॉ ईश्वर जाधव यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर घेवुन बंद केले. त्यानंतर पो.नि श्री बोडके यांनी मला व पंच क्रमांक 1 यांना लाचमागणी पडताळणी अनुशंगाने विचारपुस केली. व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण पो.नि. श्री बोडके, दोन्ही पंच, सापळा पथक यांनी ऐकले.

मी सांगितलेली हकिकत तसेच डिजीटल व्हाँईस रेकॉर्डर मधील संभाषण यावरून लोकसेवक श्री संतोष कंदेवार यांनी मला ग्रामपंचायत लेखापरिक्षण करण्यासाठी दिलेल्या कामाचे अनुषंगाने मोबदला म्हणून माझेकडे सुरूवातीस सत्तर हजार रूपयाची लाचेची मागणी करून तडजोडअंती साठ हजार रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पो.नि. श्री बोडके यांनी लोकसेवक श्री संतोष कंदेवार यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावायचा असल्याचे सांगुन ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे मला व दोन्ही पंचाना सापळा पुर्व कार्यवाहीचा उद्देश सांगितला. पो.नि श्री बोडके यांचे सुचनेवरुन पोकॉ खदिर यांनी अँथ्रासिन पावडर चे गुणधर्म व अँल्ट्राव्हाईलेट लॅम्प माहिती सांगुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पो.नि. श्री बोडके यांनी सापळा कार्यवाहीचे अनुषंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक श्री कंदेवार यांनी माझेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा करायचा ते सांगीतले. त्यानंतर माझी अंगझडती घेवून लोकसेवक श्री. कंदेवार यांना देण्यासाठी माझेकडील 50,000/- रूपये ज्यात 500 रू. दराच्या 100 चलनी नोटा घेवुन त्यास अँथ्रासिन पावडर लावुन माझे अंगात परिधान केलेल्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवले.

त्यावेळी पो.नि. श्री बोडके यांचे सुचनेवरुन पोकॉ ईश्वर जाधव यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे गळयात दोरीच्या सह्याने लटकवुन दिले. त्यांनतर मी व पंच क्र. 01 पांडूरंग काळे असे मोटारसायकल ने ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून वेळ 18.46 वा. रवाना झालो. आमचे पाठीमागे थोडे अंतर राखुन सापळा पथक मोटार सायकलने आमच्या पाठीमागे आले. मी व पंच क्र. 1 असे स्थानिक निधी लेखा परिक्षा, कार्यालय नांदेड आवारात पोहचल्यावर सापळा पथक आल्याचे पाहुन कार्यालयाच्या आत गेलो. कार्यालयात श्री कंदेवार साहेब नसल्याने मी त्यांना फोन केला असता त्यांनी फोन रिसीव्ह करून हॅलो, हॅलो बोलले व पण कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे मी त्यांना पुन्हा फोन केला असता त्यांचा फोन स्वीच ऑफ आला आणि त्यांची भेट न झाल्यामुळे मी व पंच क्रमांक 1 असे ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथे परत आलो.

त्यानंतर दिनांक 14/07/2023 रोजी आमचे कार्यालयाकडील जा.क्र स्था-18/ ब/ नां/ कार्यालयीन आदेश/अतिरिक्त पदभार /1442/2023 दिनांक 14/07/2023 अन्वये लोकसेवक श्री. संतोष कंदेवार हे दिनांक 17/03/2023 ते दिनांक 21/07/2023 रोजीपर्यत पुणे येथे कार्यशाळेस असल्याची मला माहिती मिळाली होती. नमुद कार्यशाळा संपल्यानंतर ते दिनांक 24/07/2023 रोजी कर्तव्यावर येणे अपेक्षीत होते. परंतु ते दिनांक 25/07/2023 रोजीपर्यत कर्तव्यावर हजर आले नाहीत व ते रजेवर गेले असल्याचे मला माहिती मिळालेली आहे.

तसेच आज दिनांक 25/07/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड येथे हजर येवून रात्री 09.00 ते 09.15 वा. दरम्यान मी लोकसेवक श्री कंदेवार यांना फोनवर संपर्क केला असता त्यांचा फोन लागला परंतु त्यानी माझा फोन उचलला नाही. त्यांनी माझ्याकडे मागितलेल्या लाचेच्या अनुषंगाने त्यांना संशय आला असल्याची माझी खात्री झाली आहे व ते माझेकडून लाचेची रक्कम घेण्याची शक्यता नाही.

त्यामुळे आमच्या कार्यालयाचे प्रमुख श्री. संतोष हनमंतराव कंदेवार, वय 45 वर्ष, व्यवसाय: नौकरी, पद: सहाय्यक संचालक, नेमणूक: स्थानिक निधी लेखापरिक्षा, कार्यालय नांदेड, रा. 60 कृष्णकुंज हनुमान मंदिराजवळ, पाटबंधारे नगर, तरोडा(बु), नांदेड, ता.जि. नांदेड यांनी माझेकडे दिलेल्या ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षणाचे कामाचा मोबदला म्हणून माझेकडे सुरूवातीस सत्तर हजार रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती साठ हजार रूपये लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली. नमुद लोकसेवक यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून स्वतःचा आर्थीक फायदा करून घेण्याकरीता अनुचीत गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेस माझी फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचून पाहिली असता ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MOHAN BALASAHEB BHOSALE(I (Inspector)) / 15101000402MBBM8201 |

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MOHAN BALASAHEB

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 15101000402MBBM82(



Scanned with CamScanner